जिल्हादंडाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद
(उपचिटणीस शाखा)
दुरध्वनी क्रमांक 02472-227301 फॅक्स क्रमांक 02472-228018
Email ID- rdc1osmanabad@gmail.com

---

वाचा:- 1. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 13 मार्च 2020.
2. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 14 मार्च 2020.
3. आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 चे कलम 30, 33, 34, 41 व कलम 51.
4. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897.
5. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी-3/सीआर-26 दि. 31.03.2020.
6. भारत सरकार, गृह विभाग यांचे आदेश क्र. 40-3/2020-DM-1(a) दि. 24.03.2020.
7. महाराष्ट्र शासन, महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, अधिसूचना क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 दि. 25.03.2020.
8. महाराष्ट्र शासन, महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, अधिसूचना क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 दि. 13.04.2020.
9. भारत सरकार, गृह मंत्रालय, यांचे आदेश क्र. 40-3/2020-डीएम-1(ए) दिनांक 14 एप्रिल 2020
10. भारत सरकार, गृह मंत्रालय, यांचे आदेश क्र. 40-3/2020-डीएम-1(ए) दिनांक 15 एप्रिल 2020

---

क्र.2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर- 26
दिनांकः- 15/04/2020.

**आदेश:-**

ज्याअर्थी उपरोक्त वाचा क्र. 2 चे अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" प्रसिद्ध केले असून यातील नियम क्र. 3 नुसार करोना विषाणुमुळे (COVID-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रात सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

ज्याअर्थी संदर्भ क्र. 5 अन्वये दि. 14.04.2020 पर्यंत खालील नमूद अत्यावश्यक आस्थापना वगळता उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये लॉकडाऊनचे आदेश पारित केले होते. ज्याअर्थी संदर्भ क्र. 8 अन्वये महाराष्ट्र शासनाने लॉकडाऊनचा कालावधी दि. 30 एप्रिल 2020 पर्यंत वाढविला आहे. संदर्भ क्र. 9 व 10 अन्वये भारत सरकारने कोव्हिड 19 या विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी संपूर्ण देशात लॉकडाऊनचा कालावधी दिनांक 03 मे 2020 पर्यंत वाढविला आहे.संदर्भ क्र. 6,7 व 10 अन्वये लॉकडाऊनच्या कालावधीत करावयाच्या कार्यवाहीबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत.

त्याअर्थी मी दिपा मुधोळ-मुंडे, जिल्हाधिकारी, उस्मानाबाद उपरोक्त वाचा क्र. 2 अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारांनुसार करोना विषाणूचा (COVID-19) होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधक उपाययोजनेचा एक भाग म्हणून नागरिकांची एका ठिकाणी होणारी गर्दी टाळण्यासाठी **उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये खालील आस्थापना वगळून.**

1. भारत सरकारचे संरक्षण, केंद्रीय पोलिस सुरक्षा दल, आरोग्य व कुटुंब कल्याण, आपत्ती व्यवस्थापन, राष्ट्रीय माहिती केंद्र, भारतीय अन्न महामंडळ, एनसीसी, नेहरु युवा केंद्र, कस्टम, डाक सेवा इत्यादी विभाग
2. राज्य शासनाचे पोलिस, होमगार्ड, नागरी सुरक्षा, अग्निशमन दल व अत्यावश्यक सेवा, आपत्ती व्यवस्थापन, तुरुंग व कारागृह आणि नगरपालिका सेवा, वन विभागाच्या आस्थापना, जिल्हा प्रशासन व कोषागार कार्यालये,
3. पिण्याचा पाणी पुरवठा, स्वच्छता, साफसफाई व सांडपाणी निचरा करणा-या स्थानिक स्वराज्य संस्था.
4. सर्व बँका व विमा कंपन्या, सर्व एटीएम केंद्रे,



Scanned by CamScanner

5. दूरध्वनी व इंटरनेट सेवा पुरवठा करणा-या आस्थापना.
6. जीवनावश्यक वस्तु अन्न, फळे, भाजीपाला, दूध व दुग्धजन्य पदार्थ संकलन व विक्री केंद्रे, अंडी, मांस व मासे विक्रेते, कुक्कुटपालन व्यवसाय, पशुखादय विक्रेते, किराणा सामान दुकानदार, रास्तभाव दुकाने.
7. दवाखाने, रुग्णालये, इस्पितळे व औषधी दुकाने, जनऔषधी केंद्रे, वैद्यकीय प्रयोगशाळा, पशुवैद्यकीय दवाखाने व चिकीत्सालये, पशु औषध विक्री केंद्रे.
8. विद्युत निर्मिती, विद्युत पुरवठा, विद्युत वहन व वितरण, ऑईल व गॅस वितरण, पेट्रोलियम पदार्थ व उत्पादने,
9. प्रसार माध्यमे, प्रिंट व इलेक्ट्रॉनिक मिडीया, आय. टी. सेवा देणा-या आस्थापना, कुरियर सेवा.
10. कृषी व फळबागे संबंधीची कामे, कृषीमाल खरेदी विक्री केंद्रे, कृषी अवजारे विक्री केंद्र, खते, किटकनाशके, कृषी बि-बियाणे उत्पादक व विक्रेते, मत्स्यव्यवसाय उत्पादन व विक्री.
11. शितगृहे, गोदाम साठवणूक केंद्रे, खाजगी सुरक्षा सेवा व सुविधा देणा-या संस्था.

**वरील आस्थापना व दुकाने वगळून उस्मानाबाद जिल्हयातील इतर सर्व आस्थापना व दुकाने दिनांक 03 मे, 2020 पर्यंत बंद करणेबाबत आदेशित करीत आहे.**

या आदेशाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी ही मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प., उस्मानाबाद, पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद, अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, उस्मानाबाद, सर्व उपविभागीय अधिकारी, जिल्हा उस्मानाबाद, सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, उस्मानाबाद जिल्हा प्रशासन अधिकारी, न. पा. प्र. जि. का. उस्मानाबाद, सर्व तहसिलदार, सर्व गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सर्व मुख्याधिकारी नगर परिषद/नगर पंचायत, ग्रामसेवक, तलाठी जिल्हा उस्मानाबाद इत्यादींची असेल.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती, संस्था अथवा संघटना आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 चे कलम 51 तसेच उपरोक्त वाचा क्र. 2 मधील "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" चे नियम 11 नुसार, भारतीय दंड संहिता (45 ऑफ 1860) कलम 188 मधील तरतुदींनुसार दंडनिय/कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

सदर आदेशाची अंमलबजावणी दिनांक 15.04.2020 पासून तात्काळ लागू करण्यात येत आहे.

**(दिपा मुधोळ-मुंडे)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**

**प्रत:-** 1. मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, मंत्रालय, मुंबई-32.
2. मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

**प्रत:- आवश्यक कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद.
2. पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद.
3. अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, उस्मानाबाद.
4. जिल्हा प्रशासन अधिकारी, न. पा. प्र. जि. का. उस्मानाबाद.
5. जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद.
6. विभाग नियंत्रक, रा. प. मंडळ, उस्मानाबाद.
7. उपविभागीय अधिकारी सर्व तथा INCIDENT COMMANDER जिल्हा उस्मानाबाद.
8. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रा. पं. जि. प. उस्मानाबाद.
9. सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, उस्मानाबाद.
10. तहसिलदार सर्व तथा INCIDENT COMMANDER जिल्हा उस्मानाबाद.
11. गट विकास अधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
12. मुख्याधिकारी सर्व नगर परिषद व नगर पंचायत जिल्हा उस्मानाबाद.
13. सर्व संबंधितांस अनुपालनास्तव.

15/4/20

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**

DISTRICT MAGISTRATE
OSMANABAD



Scanned by CamScanner